| | |
|---|---|
| MHNS290009552023 | हिराबाई बबन राव<br>वि.<br>सोनाली मनोज व इतर |

**विशेष दिवाणी दावा क्र.२२२/२०२३**
**आदेश निशाणी क्र.२५ वर**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ प्रमाणे वादपत्र दुरूस्तीसाठी दाखल केला आहे.

२. वादी यांचे असे कथन आहे की, सदर दाव्याचे कामकाज चालु असतांना त्यांना असे खात्रीलायक समजले आहे की, प्रतिवादी हे शेतकरी नव्हते व नाहीत. म्हणून, त्याबाबतचा मजकूर वादपत्रात समाविष्ट करणे आवश्यक व जरूरीचे आहे. सबब, प्रकरण अद्याप चौकशीला/पुराव्याला नेमलेले नसल्यामुळे प्रस्तुत अर्जाच्या परिच्छेद ३ मध्ये नमूद केलेला मजकूर वादपत्रात समाविष्ट केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही.

३. प्रतिवादी यांनी निशाणी २७ वर लेखी म्हणणे दाखल करून अर्जास विरोध केला आहे आणि अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे. प्रतिवादी यांच्या म्हणण्याप्रमाणे ते शेतकरी असल्याची खात्री करूनच तलाठी, मौजे मुकणे यांनी दावा मिळकत गट क्र.२७८ या मिळकतीच्या ७/१२ उता—यावर त्यांचे मालक म्हणूननाव लावलेले आहे. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

४. वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

५. प्रस्तुत प्रकरणामध्ये निशाणी ५ ची सुनावणी होवून त्याचा न्यायनिर्णय झाल्याचे आढळते. सदर प्रकरण अद्याप सुनावणीस लागलेले नाही. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ मधील तरतुदीनुसार प्रकरणातील वादाच्या निराकरणासाठी प्रस्तुत अर्जात नमूद केलेला मजकूर आवश्यक असल्याचे दिसते. तसेच, प्रस्तुत अर्जात नमूद केलेला मजकूर वादपत्रात समाविष्ट केल्याने व वादपत्र दुरूस्तीस परवानगी दिल्याचे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही अशी परिस्थिती आहे. सबब, मी पुढील आदेश पारित करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज निशाणी २५ मंजूर करण्यात येवून दुरूस्तीस परवानगी देण्यात येते.

२. वादी यांनी विहित मुदतीत वादपत्र दुरूस्ती करून दुरूस्ती वादपत्र दाखल करावे.

सही/—
( माधव एस. बोराळे )
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
इगतपुरी.

दि.०५.०१.२०२४.

(J.O. Code :- MH02022)

Visit **ecourts.gov.in** for updates or download mobile app “**eCourts Services**” from Android or iOS